राज्य शासकीय अधिकारी/ कर्मचाऱ्यांना विमान प्रवास सवलत अनुज्ञेय करण्याबाबत

# महाराष्ट्र शासन
## वित्त विभाग

शासन निर्णय, क्रमांक- प्रवास-१०११/प्र.क्र.१/सेवा-५
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
दिनांक : २१ जानेवारी ,२०११

**वाचा:-** (१) शा. नि. वित्त विभाग, क्रमांक:प्रवास - १००३/प्र.क्र.३८/सेवा-५, दिनांक २० एप्रिल २००४
(२) शा. नि. वित्त विभाग, क्रमांक प्रवास - १००५/प्र.क्र.५३/सेवा -५ ,दि २७ सप्टेंबर, २००५,
(३) शा. नि वित्त विभाग, क्रमांक:प्रवास - १०१०/प्र.क्र.२/सेवा-५, दिनांक ०३ मार्च,२०१०
(४) शा. नि. वित्त विभाग, क्रमांक:प्रवास - १०१०/प्र.क्र.२/सेवा-५, दिनांक २३ जून,२०१०

**प्रस्तावना:-**

विमान प्रवास विषयक प्रचलित तरतूदींनुसार सचिवांपेक्षा कनिष्ठ दर्जाच्या अधिका-यांना विमान प्रवास अनुज्ञेय ठरत नाही. केवळ न्यायालयीन व विधीमंडळ कामकाजासाठी अन्य कोणत्याही साधनाने/मार्गाने वेळेत पोहोचणे शक्य नसल्यास संबंधित प्रशासकीय विभागाच्या सचिवांच्या लेखी पूर्वपरवानगीने विमान प्रवास करता येतो. याशिवाय अन्य कोणत्याही कारणासाठी विमान प्रवास अनुज्ञेय ठरत नाही. तथापि सर्वच महत्वाच्या शासकीय कामकाजासाठी उदाहरणार्थ - केंद्र शासनाकडे महत्वाच्या बैठकींना उपस्थित रहाणे व केंद्र पुरस्कृत योजनांचे अनुदान प्राप्त करणे / पाठपुरावा करणे,अशा कामांना प्रत्येक वेळी सचिवांना उपस्थित रहाणे शक्य होत नाही. अशा प्रसंगी त्यांच्या अधिनस्त मंत्रालयीन / क्षेत्रीय स्तरावरील अधिका-यांना शासकीय कामकाजासाठी उपस्थित राहवे लागते. यासंदर्भात शासन खालील प्रमाणे आदेश देत आहे .

**शासन निर्णय:-**

न्यायालयीन व विधीमंडळाशी संबंधीत कामकाजाव्यतिरिक्त अन्य अत्यावश्यक शासकीय कामकाजासाठी प्रशासकीय विभागाच्या सचिवांनी खालील तरतुदींच्या अधिन राहून त्यांच्या अधिनस्त मंत्रालयीन/क्षेत्रिय अधिका-यांना विमान प्रवास करण्यास परवानगी द्यावी :-

१. अन्य कोणत्याही साधनाने/मार्गाने नियोजित ठिकाणी विहित वेळेत पोहोचणे शक्य नसल्यास संबंधित प्रशासकीय विभागाच्या सचिवांची पूर्वपरवानगी घेऊन विमान प्रवास करता येईल.

२. परतीच्या प्रवासासाठी ही सवलत अनुज्ञेय असणार नाही. तथापि अपवादात्मक परिस्थितीत परत येणे तातडीचे असेल तर संबंधीत विभागाच्या सचिवांची लेखी पूर्वपरवानगी घेणे आवश्यक राहील.

३. एका प्रसंगी फक्त एकाच अधिका-यास संबंधीत प्रशासकीय विभागाच्या सचिवांनी परवानगी द्यावी.

४. सदर प्रवास हा अल्प दराने सेवा पुरविणा-या विमान कंपन्यांच्या विमानाने व इकॉनॉमी क्लासनेच करणे आवश्यक राहील.

५. बिझनेस /एक्झीक्युटिव्ह क्लासने करण्यात आलेल्या विमान प्रवासाच्या खर्चाची प्रतिपूर्ती अनुज्ञेय ठरणार नाही.

६. सर्व प्रशासकीय विभागांना सदर प्रयोजनासाठी प्रत्येक आर्थिक वर्षात रु.१ लाख इतक्या कमाल मर्यादेपर्यंत खर्च अनुज्ञेय राहील. सदर खर्च संबंधीत विभागाने त्यांना आर्थिक वर्षात मंजूर तरतुदीतून करावा.

७. विमान प्रवासासंदर्भात सचिवांच्या मंजूरीने आदेश काढावेत व सदर आदेशात कामाच्या तातडीबाबतचे उचित समर्थन करावे. त्यामध्ये संबंधीत आर्थिक वर्षातील मागील विमानप्रवासाच्या देयकापर्यंतचा खर्च व संबंधीत आदेश गृहीत धरुन होणारा एकूण खर्च याबाबतचा तपशिल नमूद करावा.

८. विमानप्रवास मंजुरी आदेशाची प्रत देयकासोबत जोडून अधिदान व लेखा अधिकारी कार्यालय / जिल्हा कोषागार कार्यालय यांना पृष्ठांकित करणे आवश्यक राहील.

९. अधिदान व लेखा / जिल्हा कोषागार अधिका-यांनी विमानप्रवास मंजूरीच्या आदेशाच्या प्रतींशिवाय विमान प्रवास खर्चाची देयके पारीत करु नयेत, तसेच विभागामार्फत रु. एक लाखाच्या मर्यादेचे पालन होत आहे याचा हिशोब ठेवण्याची व्यवस्था करावी.

१०. विमान प्रवास अनुज्ञेयतेविषयी अंमलात असलेले उपरोक्त अ.क्र. (१) ते (४) हे आदेश यापुढेही अंमलात राहतील व सदरहू शासन आदेशांनुसार करण्यात आलेल्या विमान प्रवासावरील खर्च वरील परिच्छेद ६ प्रमाणे घातलेल्या रु. १ लाखांच्या मर्यादेव्यतिरिक्त राहील.

११. सदर आदेशातील तरतूदी ह्या त्वरित अंमलात येतील व सन २०१०-२०११ या आर्थिक वर्षासाठी सुद्धा रु.१ लाखापर्यंतचा खर्च अनुज्ञेय राहील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून, त्याचा संगणक संकेतांक २०११०१२११५२७४१००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(स.अ.मु. नकवी)
उप सचिव, वित्त विभाग

प्रति,
राज्यपालांचे सचिव,
मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव
उप मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
सर्व विधान सभा / परिषद सदस्य, विधान भवन, मुंबई
मंत्रालयीन सर्व प्रशासकीय विभाग,
सर्व विभागीय आयुक्त,

मंत्रालयाच्या सर्व विभागाखालील विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख,
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र,मुंबई,
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर,
महालेखापाल (लेखा परीक्षा )-१, महाराष्ट्र, मुंबई,
महालेखापाल (लेखा परीक्षा )-२, महाराष्ट्र, नागपूर,
महालेखापाल (वाणिज्यिक लेखापरीक्षा ), महाराष्ट्र, मुंबई,
* प्रबंधक, उच्च न्यायालय ( मुळ शाखा ),मुंबई,
* प्रबंधक, उच्च न्यायालय ( अपील शाखा ), मुंबई,
* सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
* सचिव, महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय, मुंबई
* प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
सिनियर रिसर्च ऑफीसर, पे रिसर्च युनिट, भारत सरकार, वित्त मंत्रालय (व्यय विभाग), खोली क्र. २६१, नॉर्थ ब्लॉक, नवी दिल्ली.
संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
मुख्य लेखापरीक्षक, स्थानिक निधी लेखा, कोकण भवन, नवी मुंबई,
उप मुख्य लेखापरीक्षक, स्थानिक निधी लेखा, मुंबई / पुणे / नागपूर / औरंगाबाद / नाशिक / अमरावती.
जनसंपर्क अधिकारी, मंत्रालय, मुंबई
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी / मुख्य लेखा व वित्त अधिकारी,
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई/वांद्रे,
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
वित्त विभागातील सर्व कार्यासने,
निवड नस्ती, वित्त विभाग/सेवा - ५.
* पत्राद्वारे